**<u>नियमित दिवाणी दावा क्र.८८६/२०२० मध्ये निशाणी ६५ वरील आदेश</u>**

०१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ ते ६ व ८ यांनी विना कैफीयत हुकूम रद्द करुन त्यांची कैफीयत अभिलेखावर घेणेसंबंधी दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादीचे थोडक्यात म्हणणे असे की, ते वयोवृध्द आहेत. आवश्यक कागदपत्रे वेळेत प्राप्त न झाल्याने त्यांना मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. प्रतिवादींना कैफियत दाखल करणे आवश्यक आहे. म्हणून त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रस्तुत अर्जास वादींनी तीव्र हरकत घेउन आपले म्हणणे अर्जावरच दाखल केले. त्यात त्यांनी अर्जातील सर्व कथनांचा इन्कार केला. वादींच्या म्हणण्याप्रमाणे अर्जात उशिर झाल्याचे कारण संयुक्तीक नाही. वादीने पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यावर प्रतिवादींतर्फे उलटतपास नाही असा आदेश पारीत झालेला आहे. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०४. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा घोषणा व निरंतर ताकीदीसाठी दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादींनी दाव्यास विहीत वेळेत त्यांची कैफीयत दाखल केलेली नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द दिनांक २२/०६/२०२३ रोजी दावा विनाकैफीयत चालवण्यासंबंधी आदेश झालेला आहे. अर्जासोबत प्रतिवादींनी कैफीयत दाखल केली आहे. दाव्याच्या प्राथमिक टप्प्यात उचित व पुरेशी संधी देउन प्रकरण गुणदोषाच्या आधारे अंतिम प्रकारे निकाली करण्याकरीता प्रतिवादींना म्हणणे दाखल करण्याची संधी देणे आवश्यक असते. अर्जातील तथ्ये नाकारण्यासारखी परिस्थिती दिसुन येत नाही. अर्जातील कारण व झालेला विलंब तसेच दाव्याचे स्वरुप पाहता

प्रतिवादींना कैफीयत मांडण्याची संधी देणे उचित वाटते. अर्जातील कारणे संयुक्तीक आहेत. अशा परिस्थितीत प्रतिपक्षास खर्चाची रक्कम देउन अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल. त्यामुळे खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज रक्कम रुपये १०००/–वादीस खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. येणेप्रमाणे कामकाज पुढे चालवणे.

सही/–

**(जी.बी.देशमुख)**

दिनांक–२७/०९/२०२३.

५ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
**<u>संगमनेर–जि. अहमदनगर</u>**